सांगली कृषी उत्पन्न बाजार समिती, सांगली

वसंतदादा मार्केट यार्ड, सांगली (महाराष्ट्र राज्य)

विविध पदभरतीसाठी जाहिरात 2020

जाहिरात क्रमांक - 1/2020

सांगली कृषी उत्पन्न बाजार समिती, सांगली मार्फत विविध रिक्त पदे भरण्याकरीता अर्हताप्राप्त उमेदवारांकडून विहित नमुन्यात, फक्त ऑनलाईन पध्दतीनेच www.mahaemployment.com या संकेतस्थळावर अधिकृत अर्ज मागविण्यात येत आहेत.

ऑनलाईन अर्ज भरण्याची सुरुवात	ऑनलाईन अर्ज भरण्याची अंतिम मुदत
दिनांक **11/06/2020** रोजी सकाळी 11	दिनांक **20/06/2020** सायंकाळी 5

ऑनलाईन पद्धतीने परीक्षाशुल्क जमा करण्याचा अंतिम दिनांक 22/06/2020

विविध पदभरती प्रक्रिया संदर्भातील सविस्तर जाहीरात www.mahaemployment.com या संकेतस्थळावर उपलब्ध असून उमेदवारांनी संपुर्ण माहीती काळजीपुर्वक समजून घेऊनच ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करावेत. प्रस्तुत पदांकरीता केवळ उक्त संकेतस्थळावरुन विहित ऑनलाईन पध्दतीने भरलेले अर्ज व विहित ऑनलाईन पद्धतीने भरलेले परीक्षाशुल्क ग्राहय धरण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहिती बाबत अद्ययावत राहण्याची जबाबदारी उमेदवारांची राहिल.

भरती प्रक्रिया/परीक्षा स्थगित करणे किंवा रद्द करणे, अंशत: बदल करणे, पदांच्या एकूण व संवर्ग निहाय संख्येमध्ये वाढ किंवा घट करणे तसेच वय, शैक्षणिक अर्हता व इतर निकषांत बदल करण्याचे अधिकार तसेच भरतीप्रक्रिये संदर्भात वाद, तक्रारी बाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार सांगली कृषी उत्पन्न बाजार समिती, सांगली यांना राहतील व त्यांचा निर्णय अंतिम असेल. त्याबाबत कोणताही दावा सांगता येणार नाही.

खालील नमुद पदांबाबत ऑनलाईन अर्ज मागविणेत येत आहेत.

वेतनश्रेणी (19900-63200 मुळ वेतन-इतर भत्ते)

पदाचे नाव	अनुसुचित जाती	अनुसचित जमाती	विमुक्त जाती - अ	भटक्या जमाती - ब	विशेष मागास प्रवर्ग	इतर मागास प्रवर्ग	एस.ई.बी.सी	ई.डब्ल्यू एस	खुला	एकूण पदे
कनिष्ठ लिपिक	1	1	-	-	-	-	-	-	**4**	**6**
संगणक चालक	1	1	-	-	-	-	-	-	**2**	**4**
टायपिस्ट	-	-	-	**1**	-	-	-	-	-	**1**
अंतर्गत तपासनीस	-	-	-	-	-	-	-	-	**1**	**1**
सेसलिपिक	-	-	**1**	-	-	-	-	-	-	**1**
एकूण	2	2	**1**	**1**	-	-	-	-	**7**	**13**

चपरासी / रखवालदार

वेतनश्रेणी (15000-47600 मुळ वेतन-इतर भत्ते)

अनुसुचित जाती	अनुसचित जमाती	विमुक्त जाती - अ	भटक्या जमाती - ब	विशेष मागास प्रवर्ग	इतर मागास प्रवर्ग	एस.ई.बी.सी	ई.डब्ल्यू एस	खुला	एकूण पदे
3	-	-	-	**1**	**5**	**1**	**1**	**2**	**13**

टिप:-

1. उमेदवारांनी केवळ एकाच पदास अर्ज करावा. एकाच वेळेस वेगवेगळ्या पदांची परीक्षा घेण्यात येणार आहे. या बाबत कोणतीही तक्रार वा दावा करता येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

आवश्यक शैक्षणिक अर्हता / अनुभव :
खाली नमूद केलेली शैक्षणिक अर्हता व अनुभव इ. 10/06/2020 या दिनांकास प्रमाणपत्रासहीत पूर्ण धारण करणे आवश्यक आहे.

शैक्षणिक पात्रता			
अ. नं	**पदाचे नांव**	**शैक्षणिक पात्रता**	**टिप**
1	कनिष्ठ लिपिक	एस.एस.सी पास किंवा तत्समतुल्य परिक्षा तसेच कोणत्याही शाखेचा पदवीधर आणि मराठी टंकलेखन 30 शब्द प्रति मिनिट, इंग्रजी टंकलेखन 40 शब्द प्रति मिनिट, महाराष्ट्र राज्य उच्च तंत्रशिक्षण मंडळ मुंबई यांचेकडील एम. एस. सी. आय. टी. परिक्षा उतीर्ण	विहीत केलेली वयोमर्यादा सर्वपदांना पुढील क्रमांक 1 ते 4 बाबतीत (पाच) वर्षे पर्यंत शिथील करणेत येईल. 1. ज्या उमेदवाराने बाजार समितीत किंवा एखाद्या सहकारी संघटनेत तीन वर्षे अखंड सेवा केली असेल असा उमेदवार. 2. मा. पणन संचालकांनी मान्यता व मंजूरी दिलेले प्रशिक्षण घेतलेला उमेदवार. 3. माजी सैनिक. 4. अति उच्च अर्हता असलेला व बाजार समितीच्या किंवा सहकारी चळवळीच्या कामकाजात अनन्य साधारण अनुभव असलेला उमेदवार.
2	संगणक चालक	मान्यताप्राप्त विद्यापिठाची संगणक पदवी आणि मराठी टंकलेखन 30 शब्द प्रति मिनिट, इंग्रजी टंकलेखन 40 शब्द प्रति मिनिट, Tally ERP 9 परिक्षा उतीर्ण.	
3	टायपिस्ट	एस.एस.सी पास किंवा तत्समतुल्य परिक्षा तसेच कोणत्याही शाखेचा पदवीधर आणि मराठी टंकलेखन 30 शब्द प्रति मिनिट, इंग्रजी टंकलेखन 40 शब्द प्रति मिनिट, महाराष्ट्र राज्य उच्च तंत्रशिक्षण मंडळ मुंबई यांचेकडील एम. एस. सी. आय. टी. परिक्षा उतीर्ण	
4	अंतर्गत तपासनीस	बी. कॉम , जी. डी. सी. ॲन्ड ए, मराठी टंकलेखन 30 शब्द प्रति मिनिट, इंग्रजी टंकलेखन 40 शब्द प्रति मिनिट, महाराष्ट्र राज्य उच्च तंत्रशिक्षण मंडळ मुंबई यांचेकडील एम. एस. सी. आय. टी. परिक्षा उतीर्ण	
5	सेसलिपिक	एस.एस.सी पास किंवा तत्समतुल्य परिक्षा तसेच कोणत्याही शाखेचा पदवीधर आणि मराठी टंकलेखन 30 शब्द प्रति मिनिट, इंग्रजी टंकलेखन 40 शब्द प्रति मिनिट, महाराष्ट्र राज्य उच्च तंत्रशिक्षण मंडळ मुंबई यांचेकडील एम. एस. सी. आय. टी. परिक्षा उतीर्ण	
6	चपरासी / रखवालदार	मान्यताप्राप्त शाळेची इयत्ता 9 वी उतीर्ण.	

टिपः
शैक्षणिक, टंकलेखन, संगणक ज्ञान, Tally ERP 9, अनुभव इ. बाबींची प्रमाणपत्रे अर्ज सादर करतेवेळी उमेदवाराकडे असणे आवश्यक आहे. अनुभव प्रमाणपत्र मोघम नसावे. अनुभव प्रमाणपत्रावर संस्थेचा/कार्यालयाचा शिक्का व स्वाक्षरी तसेच जावक क्र. असणे आवश्यक आहे. तरच संबंधित पदाचा अनुभव ग्राहय धरण्यात येईल. तसेच मानधन / वेतन मिळाल्याचा तपशील मागणी केला जाऊ शकतो याची नोंद घ्यावी. ऑनलाईन अर्ज करताना परिपूर्ण माहिती भरणे आवश्यक आहे. अर्जात भरलेल्या माहितीनुसार कागदपत्रे स्विकारुन तपासले जातील.

ऑनलाईन अर्ज करताना सोबत असणारी कागदपत्रे

कनिष्ठ लिपिक/ टायपिस्ट/ संगणक चालक/ सेसलिपिक/ अंतर्गत तपासनीस / चपरासी/रखवालदार

1.शैक्षणिक पात्रते बाबत गुणपत्रिका
2.संगणक ज्ञान, टायपिंग ज्ञान, Tally ERP 9 इ. बाबतचे प्रमाणपत्र (आवश्यकतेनुरुप पदासाठी)
3.जातबाबत जात पडताळणी प्रमाणपत्र
4.सेवायोजन/ समाजकल्याण नोंदणी प्रमाणपत्र (असलेस)
5.अनुभवाचा दाखला (असलेस)
6.शारीरिकदृष्ट्या सक्षम असले बाबतचे प्रमाणपत्र
7.राजपत्रीत अधिकारी, विधानसभा, विधानपरिषेचा किंवा संसदेचा सदस्य स्थानिक प्राधिकारी संस्थेचा किंवा बाजार समितीचा मा.अध्यक्ष किंवा मा.सदस्य यांचेपैकी एकाचे वर्तणुकीचे प्रमाणपत्र

अटी व शर्ती

1.उपरोक्त भरावयाच्या पदासाठी ऑनलाईनने अर्ज दिनांक **20/06/2020** पर्यंत भरणेचे आहे.
2. उपरोक्त पदी महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी विक्री (विकास व विनियमन) अधिनियम 1963 व त्याखालील नियम 1967 तसेच मंजूर सेवा नियम व मंजूर सेवाप्रवेश यामधील तरतुदीस अनुसरून व मा.पणन संचालक महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडील वेळोवेळी आलेल्या परिपत्रकास अधिन राहून भरती करणेत येईल.
3. उपरोक्त सर्व पदाबाबत प्रथम परिविक्षाधीन प्रशिक्षणार्थी म्हणून 6 महिने तात्पुरत्या स्वरूपात नेमणूक करणेत येईल.
4. उपरोक्त भरावयच्या पदासाठी समिती मार्फत पदानूसार 120/200 गुणांची लेखी परिक्षा घेणेत येईल.
5. उपरोक्त भरावयांच्या पदाची भरती ही सांगली शहर न्याय कक्षेत असेल.
6. उपरोक्त भरावयाच्या पदाबाबत संपुर्ण अधिकार वरील कायदा, कानू सेवा प्रवेश नियम, सेवानियम,मा.पणन संचालक महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडील परिपत्रकास अधिन राहून बाजार समितीची असेल.
7.मुळ कागदपत्रके तपासणीवेळी सादर करणे अनिवार्य आहेत.
8. उमेदवार हा महाराष्ट्रातील रहिवासी असावा.(डोमिसाईल प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक)

वयोमर्यादा

वयोमर्यादिकरीता उमेदवाराचे दिनांक 10/06/2020 रोजीचे वय विचारात घेतले जाईल.
सर्वसाधारण उमेदवाराचे वय दिनांक 10/06/2020 रोजी **18** वर्षां पेक्षा कमी नसावे व **38** वर्षां पेक्षा जास्त नसावे.
मागास उमेदवाराचे वय दिनांक 10/06/2020 रोजी **18** वर्षां पेक्षा कमी नसावे व **43** वर्षां पेक्षा जास्त नसावे.

विहीत केलेली वयोमर्यादा पुढील क्रमांक 1 ते 4 बाबतीत (पाच) वर्षे पर्यंत शिथील करणेत येईल.

1. ज्या उमेदवाराने बाजार समितीत किंवा एखाद्या सहकारी संघटनेत तीन वर्षे अखंड सेवा केली असेल असा उमेदवार. (बाजार समिती किंवा सहकारी खरेदी विक्री संघ किंवा बँकेकडे 3 वर्ष अखंड सेवा केल्याचा प्रमाणपत्रासहित अनुभव असलेले उमेदवार)
2. सहकार आणि लेखा विषयात शासकीय पदविका (GDCA) (Government Diploma in Cooperation and Accountancy) उत्तीर्ण व मा. पणन संचालकांनी मान्यता व मंजूरी दिलेले प्रशिक्षण घेतलेले उमेदवार.
3. माजी सैनिक.
4. अति उच्च अर्हता असलेला व बाजार समितीच्या किंवा सहकारी चळवळीच्या कामकाजात अनन्य साधारण अनुभव असलेला उमेदवार. (पदाच्या आवश्यकतेनूसार मान्यताप्राप्त विद्यापिठाची पदव्युत्तर पदवी व वरील क्र. 1 नूसार अनुभव असलेले उमेदवार)

परिक्षेचे स्वरुप

अ.क्र	पदनाम / संवर्ग	परिक्षेसाठी गुण		
		लेखी परिक्षा	व्यावसायिक परिक्षा	एकूण गुण
1	**कनिष्ठ लिपिक**	120	80	200

2	**संगणक चालक**	120	80	200
3	**टायपिस्ट**	120	80	200
4	**अंतर्गत तपासनीस**	120	80	200
5	**सेसलिपिक**	120	80	200
6	**चपरासी/रखवालदार**	200	--	200

प्रश्नपत्रिकेचे स्वरुप

1. लेखी परिक्षेच्या प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाच्या असतील.
2. वरील पदक्रमांक 1 ते 5 मधे व्यावसायिक परिक्षेकरीता पात्र होण्या करिता लेखी परीक्षेत किमान 45 % गुण प्राप्त करणे आवश्यक राहील.
3. वरील पदक्रमांक 1 ते 5 मधे उमेदवारांची व्यावसायिक परिक्षा घेण्यात येणार असल्याने लेखी परीक्षेमध्ये व व्यावसायिक परिक्षे मध्ये प्राप्त केलेल्या एकूण गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार अंतिम निवडीसाठी उमेदवारांना शैक्षणिक, अनुभव व इतर संबंधित मूळ प्रमाणपत्रे तपासणीसाठी उपलब्ध करुन द्यावी लागतील. अन्यथा अंतिम निवडीसाठी विचार केला जाणार नाही.
4. वरील पदक्रमांक 6 पदाकरीता लेखी परीक्षेमध्ये प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार निवड केली जाईल.
5. ज्या पदांकरिता पदवी ही कमीत कमी अर्हता आहे अशा पदांकरीता परिक्षेचा दर्जा मान्यताप्राप्त विद्यापिठांच्या पदवी परिक्षेच्या समान राहील. परंतू मराठी या विषयाच्या प्रश्नपत्रिकेचा दर्जा उच्च माध्यमिक शालांत परीक्षेच्या (इयत्ता 12 वी) च्या दर्जाच्या समान राहील. लेखी परिक्षेला मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व बौद्धीक चाचणी या विषयांवरील प्रश्नांकरीता प्रत्येकी 30 गुण ठेऊन 120 गुणांची लेखी परीक्षा घेतली जाईल.
6. चपरासी/रखवालदार पदाच्या परिक्षेचा दर्जा महाराष्ट्रातील माध्यमिक शाळेच्या परिक्षेच्या समान राहील. लेखी परिक्षेला मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व अंकगणित या विषयांवरील प्रश्नांकरीता प्रत्येकी 50 गुण ठेऊन 200 गुणांची लेखी परीक्षा घेतली जाईल.
7. निवड होणा-या उमेदवारांना जिल्हयाचा भुगोल, सामाजिक इतिहास, हवामान व स्थानिक बाबींची माहिती असणे आवश्यक आहे.
8. लेखी परिक्षा, व्यावसायिक परिक्षा, मूळ कागदपत्रे छाननी, इ. करिता प्रवेशपत्र, कार्यक्रम, विविध सूचना या केवळ संकेत स्थळावरुनच उपलब्ध करण्यात येतील पोस्टाद्वारे पाठविण्यात येणार नाहीत. सबब सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहिती/कार्यक्रमाबाबत अद्ययावत राहण्याची, प्रवेशपत्र डाऊनलोड करुन घेण्याची जबाबदारी उमेदवाराची राहिल.
9. कोविड – 19 सारखी महामारी, नैसर्गीक आपत्ती किंवा इतर प्रशासकिय अडचणींमुळे विहीत दिनांकास लेखी परिक्षा/ व्यावसायिक परिक्षा /मूळ कागदपत्र पडताळणी इ. कार्यक्रम आयोजित करणे/घेणे शक्य नसेल तर सांगली कृषी उत्पन्न बाजार समिती, सांगली हे ठरवतील त्या प्रमाणे सोयीच्या दिवशी लेखी परिक्षा/ व्यावसायिक परिक्षा / मूळ कागदपत्र पडताळणी इ. कार्यक्रम आयोजित करण्यात येईल. याबाबत सविस्तर सूचना संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येतील. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेच्या माहितीबाबत अद्ययावत राहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहिल.
10. उमेदवाराने परीक्षेस उपस्थित राहतेवेळी प्रवेशपत्र शिवाय अर्जात नमूद केलेले स्वतःचे छायाचित्र असलेले ओळखपत्र जवळ बाळगणे आवश्यक राहील. (आधार कार्ड / पॅन कार्ड / निवडणूक ओळखपत्र / वाहन परवाना इ.)

पदांच्या निवडीसाठी कार्यपद्धती, अटी, शर्ती.

1. लेखी परीक्षेअंती उमेदवारांचे प्राप्त गुण, जाहिरातीनूसार आवश्यक पात्रता व ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती यांच्या आधारे मूळ कागदपत्र पडताळणी/व्यावसायिक परिक्षे करिता अंतरिम स्वरुपात यादि जाहीर करण्यात येईल. ज्या उमेदवारांची जाहिरातीनूसार आवश्यक पात्रता, ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती, परिक्षा शुल्क, मूळ कागदपत्रांच्या आधारे परीपुर्ण सिद्ध होईल अश्याच उमेदवारांचा विचार भरती प्रक्रियेच्या पुढील टप्प्या करीता करण्यात येईल. जाहिरातीत नमूद केलेली संपुर्ण अर्हता, ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती व मूळ कागदपत्र तपासणीच्या वेळी सादर केलेली कागदपत्रे यामध्ये तफावत आढळल्यास उमेदवारांची उमेदवारी भरतीच्या कुठल्याही टप्प्यावर रद्द होऊ शकेल अथवा अश्या उमेदवारांचे मागीतलेले सामाजिक आरक्षण अथवा वयोमर्यादा शिथिलीकरण, परिक्षा शुल्क इ. सारख्या सवलती नामंजूर करण्यात येतील याची कृपया नोंद घ्यावी.

ऑनलाईन अर्ज करण्याची पद्धत

1. प्रस्तुत पदांकरीता फक्त **www.mahaemployment.com** या अधिकृत संकेतस्थळावरुन विहित पध्दतीने भरलेले ऑनलाईन पध्दतीने केलेले अर्ज स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नोंदविलेला ई-मेल आयडी. व मोबाईल क्रमांक चूकिचा/अपुर्ण तसेच मोबाईल क्रमांक NCPR रजिस्टर्ड (DND) असल्यामुळे संपुर्ण भरती प्रक्रिये दरम्यान

त्या द्वारे पाठविल्या जाणा-या सूचना, संदेश व माहीती उमेदवारांना प्राप्त न झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. तसेच ई-मेल आयडी. व मोबाईल संदेश वहनात येणा-या तांत्रिक अडचणींना सांगली कृषी उत्पन्न बाजार समिती, सांगली हे जबाबदार असणार नाही. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहितीबाबत अद्ययावत राहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहिल.

2. पात्र उमेदवाराला वेब-बेस्ड (Web-based) ऑनलाईन अर्ज **www.mahaemployment.com** या वेबसाईटद्वारे दि. 11/06/2020 ते दि. 20/06/2020 या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील.

3. उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन (online) पध्दतीने स्वीकारण्यात येणार असल्याने अर्ज करतांना, शैक्षणिक कागदपत्रे, अनूभवाची व अन्य प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक नाही. तथापि, ऑनलाईन अर्जामध्ये उमेदवाराने त्यांची पात्रतेनुसार काळजीपूर्वक संपुर्ण व खरी माहिती भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरतांना काही चुका झाल्यास किंवा त्रुटी राहील्यास व भरतीच्या कोठल्याही टप्प्यावर अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील व याबाबत उमेदवारास तक्रार करता येणार नाही. ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती बदलता येणार नाही. जाहिरातीत नमूद केलेल्या सर्व अटी तसेच शैक्षणिक अर्हता व मागणीनुसार आरक्षण, वयोमर्यादा शिथिलीकरण वगैरेची पात्रता तपासूनच ऑनलाईन अर्ज भरावा.

4. उमेदवाराची लेखीपरीक्षा ही त्यांनी ऑनलाईन अर्जातील गृहित पात्रतेनुसार कोणतीही कागदपत्रे पूर्वतपासणी/छाननी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाहीत. मूळ कागदपत्रांच्या पूर्ण छाननी नंतरच उमेदवारांची पात्रता निश्चित करण्यात येईल. लेखीपरिक्षेच्या प्राथमिक चाळणी नुसार गुणवत्तेच्या आधारे, उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या गृहित पात्रतेनुसार अंतरिम यादी प्रसिध्द करुन उमेदवारांच्या कागदपत्रांची सखोल छाननी केली जाईल/ व्यावसायिक परिक्षा घेतली जाईल. व्यावसायिक परीक्षेस गैरहजर राहणा-या उमेदवारांचा विचार अंतिम निवडी करीता केला जाणार नाही. सदर प्रक्रियेत उमेदवार अपात्र आढळल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल. अनिवार्य अर्हता धारण न करणा-या उमेदवारांना भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र करण्याचे संपूर्ण अधिकार सांगली कृषी उत्पन्न बाजार समिती, सांगली यांचे जवळ राखून ठेवण्यात आलेले आहेत व याबाबत उमेदवारास कोणतीही तक्रार करता येणार नाही.

5. ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना **www.mahaemployment.com** या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. ऑनलाईन पद्धतीने परीक्षा शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक 22/06/2020 असा राहील. अंतिम दिनांका नंतर परीक्षा शुल्क भरणा-या उमेदवारांचा विचार केला जाणार नाही.
6. संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज परिपूर्ण भरल्यानंतर लगेच किंवा अंतिम दिनांकापुर्वी परिक्षा शुल्क भरता येईल. परिक्षा शुल्क भरेस्तोवर उमेदवाराचा अर्ज अपुर्ण समजण्यात येईल व त्यास खालील संदेश दिसेल.

Payment Status: Pending

Pay Later Pay Now

ऑनलाईन पद्धतीने परिक्षा शुल्क भरण्याच्या सूचना संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. ऑनलाईन पद्धतीने परिक्षा शुल्क भरल्यानंतर Payment Receipt जतन करुन ठेवा. परिक्षा शुल्क भरण्याचा कालावधी दिनांक दि. 11/06/2020 ते 22/06/2020 पर्यंत आहे. परिक्षा शुल्क भरण्याच्या अंतिम दिनांका नंतर परिक्षा शुल्क भरणा-या उमेदवारांचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी. **ऑनलाईन पद्धतीने शुल्क भरणा-या उमेदवारांनी त्यांचा व्यवहार यशस्वी** (Payment Transaction Successful) **झाल्याची खात्री करुन घ्यावी. प्रक्रिया शुल्क भरण्याकरीता नेटबँकिंग /डेबिट कार्ड / क्रेडीट कार्ड / इतर पर्याय वापरुन होणा-या व्यवहारांची संपुर्ण जबाबदारी संपुर्णतः उमेदवाराची आहे व सांगली कृषी उत्पन्न बाजार समिती, सांगली यास जबाबदार असणार नाही.**

7. ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करताना उमेदवाराने स्वतःचे अद्ययावत 3.5 से.मी. **x** 4.5 से.मी. आकारातील "JPG/JPEG/BMP" या प्रकारचे स्कॅन केलेले छायाचित्र (Photo(व पांढ-या स्वच्छ कागदावर काळ्या शाईच्या पेनने स्वतः स्वाक्षरी करुन स्कॅन केलेली, 1.5 से.मी. **x** 3.5 से.मी. आकारातील "JPG/JPEG/BMP" प्रकारची स्वाक्षरी)Signature(स्कॅन करुन विहित पद्धतीने अपलोड करणे अनिवार्य आहे. (छायाचित्र व स्वाक्षरी च्या स्कॅन केलेल्या ईमेजचा फाईल साईज 150 **KB** पेक्षा जास्त नसावा, त्यापेक्षा मोठी फाईल अपलोड होणार नाही.)

8. ऑनलाईन अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम तारीख व वेळेनंतर संकेतस्थळावरील ऑनलाईन अर्ज भरण्याची लिंक बंद केली जाईल.

9. ऑनलाईन अर्ज प्रक्रियेच्या सर्व टप्प्यातील माहिती परिपूर्ण भरुन विहित परिक्षा शुल्क भरलेल्या उमेदवारांची स्थिती, परिक्षेची रुपरेषा/ वेळापत्रक/ परिक्षाकेंद्र/ बैठक क्रमांक इत्यादी बाबतची माहिती वर दिलेल्या (वेबसाईट) वर वेळोवेळी उपलब्ध करुन देण्यात येईल. या संबंधी स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहितीबाबत अद्ययावत राहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

10. महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचीत जमाती (विमुक्तजाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण अधिनियम 2001 (सन 2004 चा महाराष्ट्र अधिनियमक्र.8) हा अधिनियम महाराष्ट्र शासनाने दिनांक 29 जानेवारी 2004 पासून अंमलात आणला आहे. त्यानुसार उन्नत व प्रगतगटाचे (क्रिमीलेअर) तत्व वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), आणि भ.ज.(ड), विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्ग यांना लागू आहे. या प्रवर्गातील उमेदवारांनी जात, उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे अद्ययावत (नॉनक्रिमीलेयर) प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

11. सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग (एसईबीसी)- सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गातील (एसईबीसी) उमेदवारांकरिता शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांकः बीसीसी - 10/2018/प्र.क्र.130/मावक, दिनांक 7 डिसेंबर 2018 अन्वये करण्यात आलेले जातीचे प्रमाणपत्र, कागदपत्र पडताळणीच्यावेळी सादर करणे आवश्यक राहील. या प्रवर्गातील आरक्षणाचे लाभाकरीता अलिकडील/नविनतम मुळ नॉन क्रिमीलियर प्रमाणपत्र कागदपत्र तपासणीच्यावेळी सादर करणे आवश्यक आहे.

12. खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS)- खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील (EWS) उमेदवारांकरिता सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्रमांक राआधो-409/प्र.क्र.31/16-अ, दिनांक 12 फेब्रुवारी, 2019 अन्वये विहित करण्यात आलेले कागदपत्रे/पुरावा (परिशिष्ट-क) आणि घोषणापत्र (परिशिष्ट-ड) हे कागदपत्र पडताळणीच्यावेळी सादर करणे आवश्यक आहे. तसेच आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी अर्जदाराच्या/उमेदवाराच्या कुटुंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रु. 8 लाखाच्या आत असले पाहिजे व ती व्यक्ती किंवा तिचे कुटुंबीय महाराष्ट्र राज्यात दि. 13 ऑक्टोंबर 1967 रोजी किंवा त्यापूर्वीचे रहिवासी असणे आवश्यक आहे.
सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय दिनांक 12.02.2019 नुसार खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील (EWS) उमेदवारांना वय, परीक्षा फी व इतर अनुज्ञेय सवलती हया इतर मागास प्रवर्गास राज्य शासनाने वेळोवेळी लागू केलेल्या नियमानुसार राहतील.

13. सामान्य प्रशासन विभाग अधिसुचना क्र.एसआरव्ही-2000/प्र.क्र.17/2000/12, 28 मार्च 2005 व शासन परिपत्रक एसआरव्ही-2000/प्र.क्र.17/2000/12, 01 जुलै 2005 नुसार विहित केलेल्या नुसार व महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कटूंबाचे प्रतिज्ञापन) नियम 2005 अन्वये शासनाने गट अ, ब, क, ड मधील सेवा प्रवेशासाठी प्रतिज्ञापन नमुना(अ) आवश्यक अर्हता म्हणून विहीत नमुन्यातील लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन बंधनकारक आहे.

14. ऑनलाईन अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे लेखी परिक्षेस/व्यावसायीक चाचणी/ मुळ कागदपत्र पडताळणीस बोलाविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार विहित अर्हता धारण न करणारा आढळल्यास, खोटी माहिती पुरविल्यास, एखादया अर्जदाराने त्याचा निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष दबाव आणला अथवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल. तसेच, नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांची नियुक्ती समाप्त करण्यात येईल व त्यांच्या विरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

15. आरक्षित मागास प्रवर्गाचा दावा करणाऱ्या उमेदवारांना त्या संदर्भातील सक्षम अधिकाऱ्याने दिलेले जात प्रमाणपत्र (Caste Certificate) व उपलब्ध असल्यास जात वैधता प्रमाणपत्र (Validity Certificate) निवड अंती सादर करणे आवश्यक आहे.

16. जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास, शासन सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्र. बीसीसी-2011/ प्र.क्र.1064/2011/16-ब दि. 12/12/2011 मधील तरतुदीनुसार, याचिका क्र. 2136/2011 व अन्य याचिकांवर मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दि. 25/08/2011 रोजी दिलेल्या आदेशाच्या विरोधात मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे दाखल केलेल्या एसएलपी मधील आदेशाच्या

अधीन राहून, तात्पुरते नियुक्ती आदेश निर्गमित केल्याच्या दिनांकापासून 06 महिन्यांचे आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे, अन्यथा त्यांची नियुक्ती पुर्वलक्षी प्रभावाने रद्द करण्यात येईल.

17. निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्ती नंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात दिलेली माहिती अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवारांची उमेदवारी / नियुक्ती रद्द करण्यांत येईल व प्रशासनाची दिशाभूल केल्यामुळे त्यांच्यावर योग्य ती कारवाई करण्यात येईल

18. अपात्र अर्जदारांस स्वतंत्ररित्या कळविले जाणार नाही.

19. लेखी परीक्षेस/व्यावसायीक चाचणी/ मूळ कागदपत्र पडताळणीस बोलाविलेल्या अर्जदारांना स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल.

20. वरील अटी, शर्ती, नियमांव्यतिरीक्त शासन / मा. पणन संचालक / बाजार समिती यांनी वेळोवेळी निर्गमीत केलेले आदेश, ठराव, अटी, शर्ती व निर्णय लागू राहतील.

21. प्रस्तुत भरती प्रक्रियेच्या वेळोवेळी शासनाकडुन, मा. पणन संचालक यांचे कडून प्राप्त होणा-या सूचनेप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल. तसेच सदरील प्रक्रियेत काही बाबी नमूद करावयाच्या राहिल्यास किंवा अनावधानाने चूकीच्या नमूद केलेल्या असल्यास त्याबाबत प्रचलीत शासन निर्देशांनुसार/निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येईल. सदर भरती प्रक्रियेबाबत काही शंका असल्यास सांगली कृषी उत्पन्न बाजार समिती, सांगली येथे कार्यालयीन वेळेत समक्ष भेटावे.

परीक्षा शुल्क:-

पुढील प्रमाणे शुल्क भरावे लागेल. खुला प्रवर्ग - रु. 500/- मागास प्रवर्ग - रु. 300/-

टिप: - परीक्षा शुल्क भरताना आकारले जाणारे सेवा शुल्क उमेदवाराने भरावयाचे आहे.

- **ऑनलाईन पद्धतीने शुल्क भरणा-या उमेदवारांनी त्यांचा व्यवहार यशस्वी (Payment Transaction Successful) झाल्याची खात्री करुन घ्यावी. परिक्षा शुल्क भरण्याकरीता नेटबँकिंग /डेबिट कार्ड / क्रेडीट कार्ड / इतर पर्याय वापरुन होणा-या व्यवहारांची जबाबदारी संपुर्णत: उमेदवाराची आहे, सांगली कृषी उत्पन्न बाजार समिती, सांगली यास जबाबदार असणार नाही.**

रिक्त पदे भरतीचा कार्यक्रम खालीलप्रमाणे आहे.

अ. क्र	**भरती प्रक्रिया कार्यक्रम**	**दिनांक**
1	अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरण्याचा कालावधी	दिनांक 11/06/2020 (सकाळी 11) ते दिनांक 20/06/2020 (सायंकाळी 5)
2	ऑनलाईन पध्दतीने परिक्षा शुल्क जमा करण्याचा अंतिम दिनांक	दिनांक 22/06/2020

विशेष सूचना:-

ज्या उमेदवारांकडे पदाकरता आवश्यक शैक्षणिक अर्हता, अनुभव व इतर पात्रता नसेल अशा उमेदवारांनी विनाकारण अर्ज करू नयेत.

अर्जदारांना ऑनलाईन अर्ज भरण्या संदर्भात काही तांत्रिक अडचणी असल्यास त्यासाठी **Helpline Number 8605628872** वर कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी व कामकाजाच्या वेळेत (सकाळी 11 ते सायंकाळी 5) संपर्क साधावा.

दिनांकः /06/2020

सचिव सभापती, सेवक उपसमिती सभापती

सांगली कृषी उत्पन्न बाजार समिती, सांगली